# प्रकरण - 4

## नियमावली : 3

### निर्णय प्रक्रियेची पद्धती

व्यवस्थापक/सहाय्यक व्यवस्थापक ह्यांच्यामार्फत प्रस्ताव तयार करण्यात येतात व ते विविध यंत्रणांतर्फे म्हणजेच मुख्य लेखापाल (वित्तीय बाबी संबंधात), नगर अभियंता (उभारणी, पुर्नस्थापना आणि व्यापक दुरुस्ती इ. संबंधीत), विधी अधिकारी (कायदेशीर बाबी संबंधीत) मनपा उपायुक्त अतिरिक्त मनपा आयुक्त/आयुक्त ह्यांना विषयावर व बाबीचे गांभीर्य पाहून मंजूरी साठी करण्यात येतात.

सक्षम प्रधिकारयांचे निर्णय सदस्यांना/जनतेस व्यवस्थापक/सहाय्यक व्यवस्थापक अथवा मनपा उपायुक्त ह्यांच्या मार्फत कळविण्यात येतात.

**विविध स्तरांवरील कार्यालये पुढील प्रमाणे आहेत :**

1. वित्तीय बाबींसाठी संबंधित विभागातील लेखा अधिकारी.
2. किरकोळ दुरुस्तीच्या बाबीसंबंधीत उपाययोजना करण्यासंबंधीत विभागातील सहाय्यक अभियंता (परिरक्षण).
3. जलतरण तलाव उभारणीच्या पुर्नदुरुस्ती/व्यापक दुरुस्ती संबंधित बाबीसाठी नगर उप अभियंता (नियोजन व संकल्पचित्रे)
4. तरण तलाव आणि गाळणी संयंत्र ह्यांची विद्युत विषयक उभारणी संबंधीतील समस्यांबाबत कार्य अभियंता (यांत्रिकी व विद्युत)

5. पोलिस आयुक्त कार्यालयाकडून परवाना मिळविण्यासाठी त्याचे पुर्ननुतनीकरण करण्यासाठी `ना हरकत प्रमाण पत्र` घेण्यासाठी संबंधित भागातील आरोग्य अधिकारी बाब असेल तदनुसार

निर्णय प्रकरणी अंतिम प्राधिकारी मनपा आयुक्त/अतिरिक्त मनपा आयुक्त/मनपा उपायुक्त आहेत.

निर्णय घेण्यासंबंधीचे महत्वाची म्हणजे जलतरण क्रिडा विषयका संबंधित शुल्क सुधारणा होय. जनतेस मनोरंजन विषयक सेवा पुरवण्यासाठी असलेल्या विद्यमान शुल्क अनुसूची नुसार मनपास झालेला नफा/तोटा विचारात घेऊन शुल्क अनुसूचित घट/वाढकरण्यासाठी साधारणत: दर 3 वर्षानी शुल्क अनुसूची विचारात घेण्यात येते अतिरिक्त मनपा आयुक्तांची मंजुरी मिळाल्यानंतर सुधारित शुल्क अनुसूची सूचना फलकावर प्रदर्शित करुन सदस्यांस/जनतेस कळविण्यात येते

निर्णय प्रकरणी अंतर्भूत असलेल्या अधिकारी/मनपा उपायुक्त (उद्याने व सुरक्षा) असून कार्यालय, 566,एन.एम.जोशी मार्ग,बकरी आड़डा,भायखळा (प) मुंबई-400011 येथे आहे त्याचा दुरध्वनी क्र. 022-23087291 आहे.

निर्णय प्रकरणी समाधान न झाल्यास, संबंधित अतिरिक्त मनपा आयुक्त आणि/अथवा मनपा आयुक्त ह्यांजकडे अपील करता येते.